प्रपत्र – २

## सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी प्राथमिक मान्यता दिलेल्या संस्थासाठीच्या अटी व शर्ती

State of Maharashtra's Agribusiness & Rural Transformation(SMART) Project, Pune

१) सदर प्राथमिक मान्यता केवळ सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी असून कोणत्याही रूपाने उपप्रकल्प राबविण्यासाठीची मान्यता अथवा पूर्वसंमती नाही.

२) सर्व अटींची पूर्तता करणाऱ्या समुदाय आधारित संस्थांचे सविस्तर प्रकल्प अहवाल, स्मार्ट प्रकल्पास उपलब्ध आर्थिक लक्षांक व प्रकल्पाच्या उद्दिष्टांची पूर्तता यावर सविस्तर प्रकल्प अहवालांना मान्यता देणे अवलंबून असेल.

याशिवाय सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करतेवेळी खालील अटींची पूर्तता करणे अनिवार्य राहील.

३) स्मार्ट प्रकल्पातून समुदाय आधारित संस्थेमार्फत प्रस्तावित प्रकल्प किंमतीच्या अधिकतम ६०% पर्यंत अनुदान, व्यवहार्यता अंतर निधीच्या (Viability Gap Fund) स्वरूपात दिले जाईल. उर्वरित निधी संस्थेने स्वत: उभा करावयाचा आहे, यासाठी संस्था बँका व अन्य वित्तीय संस्थांकडून कर्ज घेवू शकतील तथापि कर्ज घेणे बंधनकारक राहणार नाही.

४) फलोत्पादन पिकांच्या मुल्यसाखळी उपप्रकल्पासाठी प्रति समुदाय आधारीत संस्था, अनुदान मर्यादा एकुण प्रकल्प किंमतीच्या ६०% व अधिकतम रु. ३.०० कोटी असेल, सदर प्रकल्प अहवालात शीतगृह, पिकवण गृह या बाबी प्रस्तावित केल्यास त्याची अनुदानासाठी ग्राह्य धरली जाणारी अधिकतम क्षमता पुढीलप्रमाणे असेल.

अ) शितगृह- (Cold Storage) - अधिकतम १००० मे. टन

ब) पिकवण गृह (Ripening Chamber) - अधिकतम १५० मे.टन

क) पुर्व शितकरण गृह (Pre Cooling Chamber)- ५० मे.टन.

५) फलोत्पादन पिका व्यतिरिक्त अन्य शेत पिकांच्या मुल्यसाखळी उपप्रकल्पासाठी प्रति समुदाय आधारीत संस्था, अनुदान मर्यादा प्रकल्प किंमतीच्या ६०% व अधिकतम २.०० कोटी असेल. या प्रकल्प अहवालात गोदाम बांधकाम प्रस्तावित केल्यास त्याची अनुदानासाठी ग्राह्य धरली जाणारी अधिकतम साठवण क्षमता २००० मे. टन असेल

६) सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये पिक काढण्योत्तर पायाभुत सुविधासाठींच्या (Post Harvest Infrastructure) बाबींवर किमान प्रकल्प खर्चाच्या ७०% खर्च प्रस्तावित करावा. (Post-Harvest Infrastructure includes post-harvest machinery, primary processing cleaning,



Scanned by CamScanner

grading, secondary processing, tertiary processing, packaging etc.) तसेच गुणवत्तापुर्ण उत्पादनासाठीचे तंत्रज्ञान आणि अन्य पिक काढणीपुर्व सोयी सुविधांसाठी अधिकतम एकूण प्रकल्प खर्चाचा २५% खर्च प्रस्तावित करता येईल. याबरोबरच प्रकल्प कार्यान्वयन खर्च ५% प्रस्तावित करता येईल.

७) सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये केवळ नव्याने उभ्या करावयाच्या प्रकल्प अहवाल मंजूरीनंतर राबवावयाच्या बाबींचा समावेश असावा.

८) सविस्तर प्रकल्प अहवालात प्रस्तावित घटकांची अनुदान परिगणना प्रचलित शासकीय योजनांच्या मापदंडानूसार केली जाईल. उद: फलोत्पादन पिकांच्या प्रकल्पासाठी केंद्र पुरस्कृत एकात्मिक फलोत्पादन विकास अभियाना अंतर्गत मापदंडानूसार अनुदानाची परिगणना करण्यात येईल आणि गोदाम बांधकामासाठी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे मापदंड ग्राह्य धरण्यात येतील. सर्व प्रकारच्या औजारांसाठी केंद्र पुरस्कृत कृषि अभियांत्रिकीकरण उपअभियानातील मापदंड ग्राह्य धरण्यात येतील. सर्व प्रकारच्या बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत संबंधित जिल्ह्यासाठीचे अनुसूचित दर वापरुन (DSR) सविस्तर अंदाजपत्रके तयार करणे अभिप्रेत आहे. सविस्तर प्रकल्प अहवालात प्रस्तावित बाबींसाठी कोणत्याही शासकीय योजनेत मापदंड उपलब्ध नसतील अशा बाबींसाठी व अन्य अपवादात्मक परिस्थितीत स्मार्ट प्रकल्पामार्फत मापदंड निश्चित करण्यात येतील.

९) उपरोक्त पद्धतीने सविस्तर प्रकल्प अहवाल सनदी अभियंता (Chartered Engineers), सनदी लेखापाल यांच्या मदतीने समुदाय आधारित संस्थांनी तयार करावेत आणि अशा प्रकल्प अहवालांना आणि त्यात प्रस्तावित बाबींना स्वतंत्र तांत्रिक मान्यतेची आवश्यकता राहणार नाही. तथापि प्रकल्पामार्फत सविस्तर प्रकल्प अहवालाची छाननी करण्यात येईल.

१०) प्रकल्पाने सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी दिलेल्या नमुन्यात केवळ माहिती सादर करणे म्हणजे सविस्तर प्रकल्प अहवाल होत नाही. सनदी लेखापाल व सनदी अभियंता यांच्या सहाय्याने प्रकल्पाची आर्थिक व तांत्रिक व्यवहार्यता तपासून सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करावा लागेल. अशा सविस्तर प्रकल्प अहवालांचे विशिष्ट निकषांच्या आधारे गुणांकण करून केवळ स्पर्धाक्षम सविस्तर प्रकल्प अहवालांची उपलब्ध भौतिक व आर्थिक तरतुदीच्या अधीन राहून अंतिम मंजुरीसाठी निवड केली जाईल.

११) संस्थेच्या संचालक मंडळात एका कुंटबातील एकापेक्षा जास्त संचालक नसावेत.



Scanned by CamScanner

१२) संस्थेने प्रस्तावित केलेल्या एकुण प्रकल्प खर्चाच्या किमान ५% भाग भांडवल (Paid Up Capital) संस्थेकडे जमा असावे.

१३) संस्थेस (FPC) होणाऱ्या नफ्यापैकी किमान २५% नफा भागधारकांना लाभांश स्वरूपात थेट लाभ हस्तांतरणाने (Direct Beneficiary Transfer - DBT) वाटप करणेबाबत लेखी हमी व सर्वसाधारण सभेचा ठराव सादर करावा. प्रकल्प मंजूरीनंतर नफा झाल्यास अशा लाभांशाचे वरीलप्रमाणे वाटप झाल्याशिवाय स्मार्ट प्रकल्पातून द्वितीय व तृतीय अनुदान हप्ता वितरीत होणार नाही.

१४) सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करतेवेळी समुदाय आधारित संस्थेच्या भागधारकांमध्ये प्रकल्प अंमलबजावणी कालावधीमध्ये अनुदानाचा अंतिम हप्ता मिळणेपूर्वी संस्थेमध्ये खालीलप्रमाणे भागधारकांचे प्रमाण करण्यात येईल असे लेखी अभिवचन द्यावे लागेल.

अ) अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी - ८०%

ब) महिला शेतकरी - ३०%

क) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती - जिल्ह्यातील शेतकरी संखेच्या प्रमाणात

ड) संचालक मंडळात महिलांची संख्या किमान २०%

१५) सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करताना संस्थेकडे प्रस्तावित प्रकल्पासाठी लागणारी जागा उपलब्ध असावी. अशी जागा संस्थेच्या नावावर असावी किंवा संस्थेने २९ वर्षाचा दुय्यम निबंधकाकडील नोंदणीकृत भाडे करारनामा सादर करावा.

१६) याशिवाय स्मार्ट प्रकल्पाच्या प्रकल्प अंमलबजावणी आराखडा, प्रकल्पाची संपादन पुस्तिका, प्रकल्पाची वित्तीय व्यवस्थापन पुस्तिका यामधील तरतुदी अटी व शर्तीनुसार सविस्तर प्रकल्प अहवाल असावा.

State of Maharashtra's Agribusiness & Rural Transformation (SMART) Project, Pune



Scanned by CamScanner

प्रपत्र - ४

उत्पादक भागीदारी उपप्रकल्पाकरीता (PP) सविस्तर प्रकल्प अहवालाचे किमान पुर्तता करावयाचे निकष

| अ) | प्रकल्प अंमलबजावणी आराखडयानुसार आवश्यक बाबी | शेरा (होय / नाही) |
|---|---|---|
| १ | समुदाय आधारीत संस्था कायदेशीर नोंदणीकृत संस्था आहे किंवा नाही? (एमएसआरएलएमचे प्रभाग संघ सोडून) | |
| २ | समुदाय आधारीत संस्थांचे २५० भागधारक आहेत का? (एमएसआरएलएमचे प्रभाग संघ आणि माविमचे लोकसंचलीत साधन केंद्रासाठी १०० स्वयंसहाय्यता बचत गट) | |
| ३ | समुदाय आधारीत संस्थांची मागील तीन वर्षांतील कोणत्याही एका आर्थिक वर्षाची वार्षिक लेखापरीक्षण अहवालानुसार उलाढाल किमान रु. ५ लाख आहे का? | |
| ४ | समुदाय आधारीत संस्थांचा किमान एका खरेदीदारा समवेत झालेला सामंजस्य करार अस्तित्वात आहे का? | |
| ब | **प्रशासकीय बाबी** | |
| ५ | समुदाय आधारीत संस्थेच्या संचालक मंडळामध्ये एकाच कुटुंबातील १ पेक्षा जास्त सदस्य आहेत का? | |
| ६ | समुदाय आधारीत संस्थांकडे प्रस्तावित उपप्रकल्पाच्या ५% भाग भांडवल रक्कम जमा आहे का? | |
| ७ | समुदाय आधारीत संस्थेकडे उपप्रकल्पाच्या पायाभूत सुविधा उभारणीसाठी स्वतःची जागा किंवा कायदेशीररित्या नोंदणीकृत भाडेपट्टा असलेली जागा आहे का? (किमान २९ वर्षांची भाडेपट्टा करार ) | |
| क | **वित्तीय बाबी** | |
| ८ | प्रस्तावित व्यवसाय आराखडयामधील अंतर्गत परताव्याचा दर किमान १०% आहे का ? | |
| ९ | प्रस्तावित व्यवसाय आराखडयातील Average Break Even टक्केवारी किमान ५०% आहे का? | |
| १० | प्रस्तावित व्यवसाय आराखडयातील Debt Service Coverage Ratio किमान १:५ आहे का? | |

State of Maharashtra's Agribusiness & Rural Transformation (SMART) Project, Pune

Scanned by CamScanner